# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

## वृत्तपत्र विद्या विभाग

## PROJECT- प्रकल्प

## M.J(24)

## द्वितीय सत्र- २०१८-१९

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

नूतन वर्षाच्या आपणांस हार्दिक शुभेच्छा!

यावर्षी वृत्तपत्र विद्या पारंगत (एम.जे.) अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना द्वितीय सत्रामध्ये संशोधन प्रकल्प (ठशीशरीलह झी ेक्षशलीं) सादर करावयाचा आहे. हा शोध निबंध 15 मार्च 2019 पूर्वी विद्यापीठात जमा करणे आवश्यक आहे. या शोध निबंधासाठी शंभर गुण असून तो मुदतीत पूर्ण करणे अनिवार्य आहे.

या वर्षी शोध निबंधासाठी सात विषय देण्यात येत आहेत. त्यापैकी एक विषय निवडून त्यावर सुमारे पंचवीस ते तीस पानांचा शोध निबंध लिहावयाचा आहे.

## <u>शोध निबंधासाठीचे विषय आहेत :</u>

1) राफेल प्रकरण-वास्तव किती, राजकारण किती?

2) संवैधानिक संस्थांची स्वायतत्ता धोक्यात आहे का?

3) शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि कर्जमाफीचा उपाय

4) पाच राज्यातील निवडणुका-लोकसभेची रंगीत तालीम

5) मोदी सरकारची पाच वर्षे-काही उणे काही अधिक

6) विरोधकांची महाआघाडी

7) दुष्काळ आणि शेतकऱ्यांच्या समस्या

## या वर्षासाठी देण्यात आलेले विषय अत्यंत महत्त्वाचे आणि चर्चेतील विषय आहेत.-

## १) राफेल प्रकरण-वास्तव किती, राजकारण किती?

फ्रान्स सरकारशी झालेल्या राफेल विमान खरेदीमध्ये मोदी सरकारने भ्रष्टाचार केल्याचा विरोधकांकडून आरोप होत आहे. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात शंका घेण्यासारखे काही नाही, असे म्हणत मोदी सरकारला क्लीन चीट दिली आहे. तरीही विरोधकांचे आक्षेप कायम आहेत. नेमके या प्रकरणात काय आहे यावर तुम्ही संशोधनात्मक पद्धतीने लिखाण करायचे आहे. राफेल विमानांची खरेदी फायदेशीर आहे का, मोदी सरकार यात सचोटीने वागले का, राहुल गांधींचे आरोप खरे किती प्रचार की भाग किती : मोदींच्या प्रामाणिकपणावर यामुळे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे का, आगामी निवडणुकीत हा मुद्दा महत्त्वाचा असेल का, अशा काही मुद्यांवर तुमच्या शोध निबंधाचा रोख असावा.

## २) संवैधानिक संस्थांची स्वायतत्ता धोक्यात आहे का?

संवैधानिक संस्थांची स्वायत्तता धोक्यात आहे का? या विषयावरील शोध निबंधात गेल्या पाच वर्षात मोदी सरकारकडून संवैधानिक संस्थांच्या कारभारातील हस्तक्षेपाची चर्चा अपेक्षित आहे. रिझर्व्ह बँक, सीबीआय, न्यायालये यांसारख्या संस्थांच्या स्वायत्ततेवर परिणाम करणारे अनेक निर्णय मोदी सरकारने घेतले. त्याचा विरोधकांनी खरपूस समाचार घेतला. सरकारचा असा हस्तक्षेप देश लोकशाहीकडून हुकूमशाहीकडे वाटचालीकडे घेऊन जाणारा आहे का याची चर्चा या शोधनिबंधात अपेक्षित आहे.

## ३) शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि कर्जमाफीचा उपाय

शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि कर्जमाफी या मुद्याने गेले वर्ष गाजले. महाराष्ट्रात या प्रश्नावर शेतकरी मोर्चे आणि आंदोलने झाली. विरोधकांनी सभागृहाचे कामकाज रोखले. कर्जमाफीचा निर्णय जाहीर झाला. लाखो शेतकऱ्यांची कर्जमाफी झाल्याचा दावा सरकारने केला. कर्जमाफीने शेतकऱ्यांचे प्रश्न सुटणार आहेत का? की ती तात्पुरती मलमपट्टी आहे. यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेवर, बँकींग व्यवस्थेवर विपरीत परिणाम तर होत नाही ना? शेतकऱ्यांना सावरण्यासाठी वेगळया उपायांची आवश्यकता आहे आदि मुद्दे लक्षात घेऊन या विषयावर तुम्ही लेखन करायचे आहे.

## ४ )पाच राज्यातील निवडणुका-लोकसभेची रंगीत तालीम

पाच राज्यातील निवडणुका : नोव्हेंबर महिन्यात झालेल्या निवडणुकीत हिंदी भाषिक पट्ट्यातील राज्यात भाजपला पराभव पत्करावा लागला. काँग्रेसची कामगिरी सरस ठरली. या पराभवाचे आत्म परीक्षण सत्ताधारी आणि विरोधकांचना करावे लागणार आहे. भाजपच्या पराभवाची कारणे, कोणती, भाजपला अतिआत्मविश्वास नडला का? हिंदुत्वाच्या मुद्दा कमकुवत बनला आहे का, काँग्रेसची प्रतिमा खरोखरीच उजाळली आहे का, या निवडणुकीचे आगामी लोकसभाग निवडणुकीवर काय परिणाम होऊ शकतात, या निवडणुकांसाठी पाच राज्यातील निवडणूक निकाल निर्णायक ठरू शकतील का? भाजपची आणि मुख्यत: मोदी आणि शहा यांची प्रतिमा ढासळत आहे का? सरकारची धोरणे सर्वसामान्यांना आश्वासक वाटत नाही का? काँग्रेस नव्या नेत्तृत्वाखाली पुन्हा देशभरात उभारी धरणार याचे संकेत निवडणूक देते काय अशा काही गृहीतकांवर आधारित हा शोध निबंध असावा, असे तुम्हाला वाटते का? हे मुद्दे या शोध निबंधात अपेक्षित आहेत.

## ५)मोदी सरकारची पाच वर्षे-काही उणे काही अधिक

मोदी सरकारच्या पाच वर्षातील कामगिरीचा आढावा, त्यांनी घेतलेले निर्णय, त्यातील जी.एस.टी आणि नोटाबंदीसारखे वादग्रस्त निर्णय यामुळे भाजपची प्रतिमा घसरली आहे का? शेतकऱ्यांचे, कामगारांचे, सेवानिवृत्ताचे प्रश्न सोडवण्यात हे सरकार अपयशी ठरले आहे का? आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची प्रतिमा मोदी यांच्या दौऱ्यांमुळे उजाळली आहे का? काँग्रेसच्या तुलनेत भाजपची कामगिरी तुम्हाला कशी वाटली? या अनुषंगाने हा शोध निबंध लिहायचा आहे.

## ६ )विरोधकांची महाआघाडी

याच पार्श्वभूमीवर विरोधकांची महाआघाडी हा मोदीवर आणि भाजपला समर्थ पर्याय म्हणू्न उभा राहील का? राहुल गांधीचे नेतृत्व सर्वमान्य होऊ शकते का? विरोधक मोदींच्या पराभवासाठी एकत्र येतील का, त्यांचे आपसातील मतभेद निसटतील का, नेतृत्वाच्या मुद्यांवर त्यांच्यात एकमत होईल का? या मुद्यांवर या शोधनिबंधातून प्रकाशझोत पडायला हवा.

## ७) दुष्काळ आणि शेतकऱ्यांच्या समस्या

शेतकऱ्यांच्या समस्या- गेल्या वर्षभरात देशाच्या विविध भागांत शेतकऱ्यांची हमीभावासाठी आंदोलने झाली. महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या. शेतमालाच्या भावात 30 ते 40 टक्के घसरण झाली. त्याचा फटका सत्ताधारी पक्षाला बसला. शेतकऱ्यांचा असंतोष हे भाजपच्या शेतकरीविरोधी धोरणाचे कारण आहे. शेतकऱ्यांना स्वामीनाथन आयोगाची अंमलबजावणी हवी आहे. शेतमालाला शाश्वत भाव मिळाला पाहिजे. भारतीय शेती अनिश्चिततेच्या भोवऱ्यात आहे. निसर्गाची अवकृपा, दुष्काळ, कर्जबाजारीपणा आणि पडते शेतमालाचे भाव अशा संकटांचा सामना शेतकऱ्यांना करावा लागत आहे. या सर्व कारणांचा वेध घेऊन विद्यार्थ्यांनी शोधनिबंध लिहावयाचा आहे. शेतकऱ्यांचे मोर्चे, विधीमंडळात शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी भांडणारे विरोधी पक्ष असे चित्र आशादायक आहे का? यातून शेती आणि शेतकऱ्यांच्या समस्या सुटतील का? राजकीय पक्ष शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे भांडवल करीत आहेत काय? या प्रश्नांची उत्तरे तुम्हाला शोधायची आहेत.

या शोधनिबंधासाठीही वर्षभरात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, वार्तापत्रे, अग्रलेख, वेगवेगळ्या व्यासपीठावरून या संदर्भात झालेल्या चर्चा यांचा आधार घेता येईल. हा शोध निबंधही आकडेवारी, तक्ते, कात्रणे यांच्या साधार माहितीसह लिहावयाचा आहे.

# मुलाखत तंत्र :

एम.जे.च्या विद्यार्थ्यांना यावर्षी मुलाखत तंत्र हा विषय आहे. त्यासाठी 40 गुण अंतर्गत मुल्यमापनाचे असतील. अंतर्गत मूल्यमापनाचे प्रश्न असाइनमेंट बरोबर दिले जातील. 60 गुणांसाठी विद्यार्थ्यांनी सामाजिक कार्यकर्ते, दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांच्या व जनसामान्यांच्या समस्या जाणून घेणाऱ्या काही मुलाखती, महिलांच्या प्रश्नांसंदर्भात ग्रामीण महिलांच्या मुलाखती, प्रसिद्ध कलाकार अभिनेते, लेख आणि त्यांची कामगिरी व कलाकृती इत्यादी विषय निवडून एक सविस्तर मुलाखतीचे लेखन करायाचे आहे.

शोधनिबंध आणि मुलाखती 15 मार्च 2019 पूर्वी विद्यापीठाकडे किंवा आपल्या केंद्रावर जमा करावयाचा आहे.